श्रीसमर्थ रामदासस्वामिकृत

# श्रीमनाचे श्लोक

॥ जय जय रघुवीर समर्थ॥

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा।
मुळारंभ[१] आरंभ तो निर्गुणाचा।
नमूं शारदा मूळ चत्वार[२] वाचा।
गमूं पंथ आनंत या राघवाचा॥१॥

मना सज्जना भक्तिपंथेचि जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें।
जनीं निंद्य ते सर्व सोडोनि द्यावें।
जनीं वंद्य ते सर्वभावें करावें॥२॥

(१) मुळ पुरुष,(२) परा,पश्यंती,मध्यमा,वैखरी या चार वाणी



प्रभातें मनी राम चिंतीत जावा।
पुढें वैखरीं राम आधीं वदावा।
सदाचार हा थोर सांडूं नये तो।
जनीं तोचि तो मानवीं धन्य होतो॥३॥

मना वासना दुष्ट कामा नये रे।
मना सर्वथा पापबुद्धि नको रे।
मना धर्मता नीति सोडूं नको हो।
मना अंतरीं सार वीचार राहो॥४॥

मना पापसंकल्प सोडोनि द्यावा।
मना सत्यसंकल्प जीवीं धरावा।
मना कल्पना ते नको वीषयांची।
विकारें घडे हो जनीं सर्व ची ची[१]॥५॥

(१) छीः थू - बदनामी, नामुष्की



नको रे मना क्रोध हा खेदकारी।
नको रे मना काम नानाविकारी
नको रे मना लोभ हा अंगिकारूं।
नको रे मना मत्सरू दंभ भारु[१]॥६॥

मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें।
मना बोलणें नीच सोशीत जावें।
स्वयें सर्वदा नम्र वाचें वदावें।
मना सर्व लोकांसि रे नीववावें[२]॥७॥

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी।
मना सज्जना हेचि क्रीया धरावी।
मना चंदनाचेपरी त्वां झिजावें।
परी अंतरीं सज्जना नीववावें॥८॥

(१) दंभ भारु -(दंभ म्हणजे ढोंग आणि भारु म्हणजे ओझे) ढोंगीबाजीचे ओझे (२) नीववावे - शांत करावे



नको रे मना द्रव्य तें पूढिलांचें[१]।
अति स्वार्थबुधी न रे पाप सांचे ।
घडे भोगणें पाप तें कर्म खोटें।
न होतां मनासारिखें दुख मोठें॥९॥

सदा सर्वदा प्रीति रामीं धरावी।
दुखाची स्वयें सांडि[२] जीवीं करावी।
देहेदुख तें सूख मानीत जावें।
विवेकें सदा सस्वरूपीं[३] भरावें॥१०॥

जनीं सर्वसूखी असा कोण आहे ।
विचारें मना तूंचि शोधूनि पाहे।
मना तां चि रे पूर्वसंचीत[४] केलें।
तयासारिखें भोगणें प्राप्त जालें॥११॥

(१) परद्रव्य - दुसऱ्याच्या मालकीचे (२) त्याग,
(३) आत्मस्वरूपी (४) आपली पूर्वीची कर्मे

..५..

मना मानसीं दुख आणूं नको रे।
मना सर्वथा शोक चिंता नको रे।
विवेकें देहेबुधि[१] सोडूनि द्यावी।
विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी॥१२॥

मना सांग पां रावणां काय जालें।
अकस्मात तें राज्य सर्वै बुडालें।
म्हणोनी कुडीं[२] वासना सांडि वेगीं।
बळें लागला काळ हा पाठिलागीं॥१३॥

जिवां कर्मयोगें जनीं जन्म जाला।
परी शेवटी काळमूखी निमाला।
महां थोर ते मृत्युपंथेचि गेले।
कितीयेक ते जन्मले आणि मेले॥१४॥

(१) मी देह आहे अशी धारणा (२) वाईट

..६..

मना पाहतां सत्य हे मृत्यूभूमी।
जिता बोलती सर्वही जीव मी मी।
चिरंजीव हे सर्वही मानिताती।
अकस्मात सांडूनियां सर्व जाती॥१५॥

मरे येक त्याचा दुजा शोक वाहे।
अकस्मात तोही पुढें जात आहे।
पुरेना जनीं लोभ रे क्षोभ[१] त्यातें।
म्हणोनी जनीं मागुता जन्म घेतें॥१६॥

मनीं मानव वेर्थ चिंता वाहातें।
अकस्मात होणार होऊनि जातें।
घडे भोगणें सर्वही कर्मयोगें।
मतीमंद तें खेद मानी वियोगें॥१७॥

(१) अशांती

..७..

मना राघवेवीण आशा नको रे।
मना मानवाची नको कीर्ति तूं रे।
जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें।
तया वर्णितां सर्वही श्लाघ्यवाणें[१]॥१८॥

मना सर्वथा सत्य सांडूं नको रे।
मना सर्वथा मिथ्य मांडूं नको रे।
मना सत्य तें सत्य वाचे वदावें।
मना मिथ्य तें मिथ्य सोडूनि द्यावें॥१९॥

बहू हिंपुटी[२] होइजे मायपोटीं।
नको रे मना यातना तेचि मोठी।
निरोधें[३] पचे[४] कोंडिलें गर्भवासीं।
अधोमूख[५] रे दुख त्या बाळकासीं॥२०॥

(१) योग्य (२) कष्टी (३) अडकल्यामुळे (४) उकडला जाणे (५) खाली तोंड करून असलेले मुल

..८..

मना वासना चूकवी येरझारा।
मना कामना सांडि रे द्रव्यदारा।
मना यातना थोर हे गर्भवासीं।
मना सज्जना भेटवीं राघवासी॥२१॥

मना सज्जना हीत माझें करावें।
रघूनायका दृढ चित्तीं धरावें।
महाराज तो स्वामी वायूसुताचा।
जना उधरी नाथ लोकत्रयाचा॥२२॥

न बोले मना राघवेंवीण कांही।
जनीं वाउगें बोलतां सूख नाहीं।
घडीनें घडी काळ आयुष्य नेतो।
देहयान्तीं तुला कोण सोडूं पहातो॥२३॥

..९..

रघुनायकावीण वायां सिणावें।
जनासारिखें वेर्थ कां वोसणावें[१]।
सदा सर्वदा नाम वाचें वसो दे।
अहंता मनीं पापिणी ते नसो दे ॥२४॥

मना वीट मानूं नको बोलण्याचा।
पुढें मागुता राम जोडेल कैचा ।
सुखाची घडी लोटतां सूख आहे।
पुढें सर्व जाईल कांहीं न राहे॥२५॥

देहेरक्षणाकारणें येत्न केला।
परी शेवटीं काळ घेऊनि गेला।
करी रे मना भक्ति या राघवाची।
पुढें अंतरीं सोडिं चिंता भवाची[२]॥२६॥

(१) बडबडावे (२) जगाची

..१०..

भवाच्या भयें काय भीतोसि लंडी[१]।
धरी रे मना धीर धाकासि सांडी।
रघुनायकासारिखा स्वामी शीरीं।
नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी[२]॥२७॥

दिनानाथ हा राम कोंदडधारी[३]।
पुढे देखतां काळ पोटीं थरारी।
जना वाक्य नेमस्त[४] हें सत्य मानी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥२८॥

पदीं राघवाचें सदा ब्रीद[५] गाजे।
बळे भक्तरीपूशिरीं कांबि[६] वाजे।
पुरी[७] वाइली सर्व जेणें विमानीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥२९॥

(१) भित्रा (२) यम (३) धर्नुधारी (४) निश्चित
(५) प्रतिज्ञा (६) धनुष्याचा दंड (७) अयोध्या नगरी

..११..

समर्थाचिया सेवका वक्र पाहे।
असा सर्व भूमंडळी कोण आहे ।
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥३०॥

महासंकटी सोडिले देव जेणें।
प्रतापें बळें आगळा सर्व गूणें।
जयातें स्मरे शैलजा शूळपाणी[१]।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥३१॥

अहिल्या शिळा राघवें मुक्त केली।
पदीं लागतां दिव्य होऊनि गेली।
जया वर्णितां सीणली वेदवाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥३२॥

(१) निशंक

..१२..

वसे मेरुमांदार हे सृष्टिलीळा।
शशी सुर्ये तारांगणें मेघमाळा।
चिरंजीव केले जनीं दास दोन्ही[१]।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥३३॥

उपेक्षा[२] कदा रामरूपीं असेना।
जिवां मानवां निश्चये तो वसेना।
शिरीं भार वाहे न बोले पुराणीं।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥३४॥

असे हो जया अंतरीं भाव जैसा।
वसे हो तया अंतरी देव तैसा।
अनन्यास रक्षीतसे चापपाणी[३]।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥३५॥

(१) बिभिषण, हनुमान (२) दुर्लक्ष (३) ज्याच्या हातात
धनुष्य आहे

..१३..

सदा सर्वदा देव सन्नीध आहे।
कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे।
सुखानंद आनंद कैवल्यदानी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३६।।

सदा चक्रवाकासि मार्तंड जैसा।
उडी घालतो संकटीं स्वामि तैसा।
हरीभक्तिचा घाव गाजे निशाणी।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी।।३७।।

मना प्रार्थना तूजला येक आहे।
रघूराज थकीत होऊनि पाहे।
अवज्ञा[१] कदा हो येदर्थीं न कीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे।।३८।।

(१) अनादर

..१४..

जया वर्णिती वेद शास्त्रें पुराणें।
जयाचेनि योगे समाधान बाणें।
तयालागी हें सर्व चांचल्य दीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे।।३९।।

मना पाविजे सर्वही सूख जेथें।
अती आदरें ठेविजे लक्ष तेथें।
विवेकें कुडी कल्पना पालटीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे।।४०।।

बहु हिंडता सौख्य होणार नाहीं।
सिणावे परी नातुडे[१] हीत कांहीं।
विचारें बरें अंतरा बोधवीजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे।।४१।।

(१) प्राप्त होत नाही

..१५..

बहुतांपरी हेंचि आता धरावें।
रघुनायका आपुलेसे करावें।
दिनानाथ हे तोडरीं[१] ब्रीद गाजे।
मना सज्जना राघवीं वस्ति कीजे।।४२।।

मना सज्जना येक जीवीं धरावें।
जनी आपुलें हीत तुंवां करावें।
रघुनायकावीण बोलों नको हो।
सदा मानसीं तो निजध्यास राहो।।४३।।

मना रे जनीं मौन्यमुद्रा धरावी।
कथा आदरें राघवाची करावी।
नसे राम तें धाम सोडून द्यावें।
सुखालागिं आरण्य सेवीत जावें ।।४४।।

(१) पायातील एक दागिना

..१६..

जयाचेनि संगें समाधान भंगे।
अहंता अकस्मात येऊनि लागे।
तये संगतीची जनी कोण गोडी।
जिये संगतीनें मति राम सोडी।।४५।।

मना जे घडी राघवेंवीण गेली।
जनीं आपुले ते तुवां हानि केली।
रघुनायकावीण तो सीण आहे।
जनी दक्ष तो लक्ष लाऊनि पाहे।।४६।।

मनी लोचनी श्रीहरी तो चि पाहे।
जनी जाणता भक्त होऊनि राहे।
गुणी प्रीति राखे क्रमूं साधनाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा।।४७।।

..१७..

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा।
सदा रामनामें वदे नित्य वाचा।
स्वधर्मे चि चाले सदा उत्तमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥४८॥

सदा बोलण्यासारिखे चालताहे।
अनेकीं सदा एक देवासि पाहे।
सगुणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥४९॥

नसे अंतरीं कामकारी[१] विकारी।
उदासीन जो तापसी[२] ब्रह्मचारी।
निवाला मनी लेश नाहीं तमाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५०॥

(१) वासनामय (२) तपश्चर्या करणारा

..१८..

मदें मछरें सांडिली स्वार्थबुधी।
प्रपंचीक नाहीं जयातें उपाधी।
सदा बोलणे नम्र वाचा सुवाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५१॥

क्रमी वेळ जो तत्वचिंतानुवादें[१]।
न लिंपे[२] कदा दंभ वादे विवादें।
करी सूखसंवाद जो ऊगमाचा[३]।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५२॥

सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोंकी।
सदा सर्वदा सत्यवादी विवेकी।
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा।
जगी धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५३॥

(१) परतम्याचे अखंड चिंतन (२) लिप्त होणे किंवा चिकटणे (३) आपल्या मूळ स्वरूपाचा

..१९..

सदा सेवि आरण्य[१] तारुण्यकाळी।
मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं।
चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५४॥

नसे मानसीं नष्ट आशा दुराशा[२]।
वसे अंतरी प्रेमपाशा पिपाशा[३]।
ऋणी देव हा भक्तिभावें जयाचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५५॥

दिनाचा दयाळु मनाचा मवाळु।
स्नेहाळु कृपाळु जनीं दास पाळु।
तया अंतरी क्रोध संताप कैचा।
जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥५६॥

(१) एकांतवास (२) वाईट इच्छा (३) तहान

..२०..

जगी होईजे धन्य या रामनामें।
क्रिया भक्ति उपासना नित्यनेमें।
उदासीनता तत्वता सार आहे।
सदा सर्वदा मोकळी वृत्ति राहे॥५७॥

नको वासना वीषईं वृत्तिरूपें।
पदार्थी जडे कामना पूर्वपापें।
सदा राम निःकाम चिंतीत जावा।
मना कल्पनालेश तो ही नसावा॥५८॥

मना कल्पना कल्पितां कल्पकोटी।
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी।
मनीं कामना राम नाहीं जयाला।
अती आदरें प्रीति नाहीं तयाला॥५९॥

..२१..

मना राम कल्पतरु कामधेनु।
निधी सार चिंतामणी काय वानूं ।
जयाचेनि योगें घडे सर्व सत्ता।
तया साम्यता कायसी कोण आता॥६०॥

उभा कल्पवृक्षातळी दुख वाहे।
तया अंतरी सर्वदा तें चि आहे।
जनीं सज्जनीं वाद हा वाढवावा।
पुढें मागुता शोक जीवीं धरावा॥६१॥

निजध्यास[१] तो सर्व तूटोनि गेला।
बळे अंतरी शोक संताप ठेला।
सुखानंद आनंद भेदें बुडाला।
मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला॥६२॥

(१) सतत आत्मस्वरूपाचे चिंतन

..२२..

घरी कामधेनू पुढें ताक मागे।
हरीबोध सांडूनि वेवाद लागे।
करी सार चिंतामणी काचखंडें[१]।
तया मागता देत आहे उदंडे॥६३॥

अती मूढ त्या दृढ बुधी असेना।
अती काम त्या राम चित्तीं वसेना।
अती लोभ त्या क्षोभ होईल जाणा।
अती विषई सर्वदा दैन्यवाणा॥६४॥

नको दैन्यवाणें जिणें भक्तिउणें।
अती मूर्ख त्या सर्वदा दुःख दुणें।
धरीं रे मना आदरे प्रीति रामीं।
नको वासना हेमधामीं[२] विरामीं॥६५॥

(१) काचेचे तुकडे (२) सोन्याचा राजवाडा

..२३..

नव्हे सार संसार हा घोर आहे।
मना सज्जना सत्य शोधूनि पाहें।
जनी वीष खातां पुढें सूख कैचे।
करी रे मना ध्यान या राघवाचें॥६६॥

घनश्याम हा राम लावण्यरुपी।
महां धीर गंभीर पूर्णप्रतापी।
करी संकटी सेवकाचा कुढावा[१]।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥६७॥

बळे आगळा राम कोंदडधारी।
महा काळ विक्राळ[२] तो ही थरारी।
पुढें मानवा किंकरा[३] कोण केवा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥६८॥

(१) रक्षण (२) महाभयंकर, (३) सेवक

..२४..

सुखानंदकारी निवारी[१] भयातें।
जगीं भक्तिभावें भजावें तयातें।
विवेकें तजावा[२] अनाचार हेवा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥६९॥

सदा रामनामे वदा पूर्णकामें।
कदा बाधिजेनापदा[३] नित्यनेमें।
मदालस्य हा सर्व सोडूनि द्यावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७०॥

जयाचेनि नामें महा दोष जाती।
जयाचेनि नामें गती पाविजेती।
जयाचेनि नामें घडे पुण्यठेवा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७१॥

(१) निवारण करतो (२) सोडून द्यावा (३) बाधिजेना
+ आपदा म्हणजे संकट बाधत नाही.

..२५..

न वेंचे[१] कदा ग्रंथिचे[२] अर्थ काही।
मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं।
महा घोर संसार शत्रु जिणावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७२॥

देहेदंडणेचें महां दुख आहे।
महां दुख तें नाम घेतां न राहे।
सदाशीव चिंतीतसे देवदेवा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७३॥

बहूतांपरी संकटें साधनाचीं।
व्रतें दान उद्यापनें तें धनाचीं।
दिनाचा दयाळु मनीं आठवावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७४॥

(१) खर्च (२) पदरचे

..२६..

समस्तामधें सार साचार आहे।
कळेना तरी सर्व शोधून पाहें।
जिवा संशयो वाउगा तो तजावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७५॥

नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं।
नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं।
म्हणे दास विश्वास नामीं धरावा।
प्रभाते मनीं राम चिंतीत जावा॥७६॥

करी काम निःकाम[१] या राघवाचें।
करी रूप स्वरूप सर्वां जिवांचें।
करी छेद निर्द्वंद[२] हे गूण गातां।
हरीकिर्तनीं वृत्तिविश्वास होतां॥७७॥

(१) निरिच्छ (२) द्वंद्व रहित

..२७..

अहा ज्या नरा रामविश्वास नाहीं।
तया पामरा बाधिजे सर्व कांहीं।
महाराज तो स्वामी कैवल्यदाता[१]।
वृथा वाहणें देहेसंसार चिंता॥७८॥

मना पावना भावना राघवाची।
धरी अंतरीं सोडिं चिंता भवाची।
भवाची जिवा मानवा भूलि ठेली।
नसे वस्तुची धारणा वेर्थ गेली॥७९॥

धरा श्रीधरा त्या हरा अंतरातें।
तरा दुस्तरा[२] त्या परा सागरातें।
सरा वीसरा त्या भरा दुर्भरातें[३]।
करा नीकरा[४] त्या खरा[५] मछरातें॥८०॥

(१) मोक्ष देणारा (२) तरून जाण्यास कठीण (३) पूर्ण भरणे कठीण (४) हट्टाने पिच्छा पुरविणे (५) दुष्ट

..२८..

मना मछरें नाम सांडूं नको हो।
अती आदरें हा निजध्यास राहो।
समस्तामधे नाम हें सार आहे।
दुजी तूळणा तूळितां ही न साहे॥८१॥

बहू नाम या रामनामीं तुळेना।
अभाग्या नरा पामरा हें कळेना।
विषा औषध घेतलें पार्वतीशें[१]।
जिवा मानवा किंकरा कोण पूसे॥८२॥

जेणें जाळिला काम तो राम ध्यातो।
उमेसीं अती आदरें गूण गातो।
बहू ज्ञान वैराग्य सामर्थ्ये जेथें।
परी अंतरीं नामविश्वास तेथें॥८३॥

(१) शंकराने

..२९..

विठोनें शिरीं[१] वाहिला देवराणा।
तया अंतरी ध्यास रे त्यासि नेणा।
निवाला स्वयें तापसी चंद्रमौळी[२]।
जिवां सोडवी राम हा अंतकाळीं।।८४।।

भजा राम विश्राम[३] योगेश्वरांचा।
जपू नेमिला नेम गौरीहराचा।
स्वयें नीववी तापसी चंद्रमौळी।
तुम्हा सोडवी राम हा अंतकाळीं ।।८५।।

मुखीं राम विश्राम तेथेंचि आहे।
सदानंद आनंद सेऊनि राहे।
तयावीण तो सीण संदेहकारी।
निजधाम[४] हें नाम शोकापहारी[५] ।।८६।।

---

(१) पंढरपूरला विठ्ठलाच्या मस्तकावर शंकराची पिंड आहे (२) शंकर (३) विश्रांतीची जागा (४) मुक्ती देणारे मुक्कामाचे ठिकाण(५) दुःख नाहीसे करणारा

..३०..

मुखीं राम त्या काम बांधू शकेना।
गुणें इष्ट धारिष्ट त्याचें चुकेना।
हरीभक्त तो शक्त[१] कामास मारी।
जगीं धन्य तो मारुती ब्रह्मच्यारी।।८७।।

बहू चांगलें नाम या राघवाचें।
अती साजिरें स्वल्प सोपें फुकाचें[२]।
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें।
जिवां मानवां हें चि कैवल्य[३] साचें।।८८।।

जनीं भोजनीं नाम वाचें वदावें।
अती आदरें गद्य घोषें म्हणावें।
हरीचिंतनें अन्न जेवीत जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें।।८९।।

---

(१) सामर्थ्यशाली (२) विनामुल्य (३) मोक्ष

..३१..

न ये रामवाणी तया थोर हाणी।
जनीं वेर्थ प्राणी तया नाम काणी[१]।
हरीनाम हें वेदशास्त्री पुराणीं
बहू आगळे बोलिली व्यासवाणी।।९०।।

नको वीट मानूं रघूनायेकाचा।
अती आदरें बोलिजे राम वाचा।
न वेचे मुखीं सांपडे रे फुकाचा।
करी घोष त्या जानकीवल्लभाचा।।९१।।

अती आदरें सर्व ही नामघोषे।
गिरीकंदरें जाइजे दूरि दोषें।
हरी तिष्ठतु तोषला नामतोषें।
विशेषें हरा मानसीं रामपीसें।।९२।।

---

(१) अत्यंत हीन

..३२..

जगीं पाहतां देव हा अन्नदाता।
तया लागली तत्त्वतां सार चिंता।
तयाचें मुखीं नाम घेता फुकाचें।
मना सांग पां रे तुझें काय वेचे।।९३।।

तिन्ही लोक जाळूं शके कोप येतां।
निवाला हरू तो मुखे नाम घेतां।
जपे आदरें पार्वती विश्वमाता।
म्हणोनी म्हणा तेंचि हें नाम आतां।।९४।।

अजामेळ पापी वदे पुत्रकामें।
तया मुक्ति नारायणाचेनि नामें।
शुकाकारणें[१] कुंटणी[२] राम वाणी।
मुखें बोलतां ख्याति जाली पुराणीं।।९५।।

---

(१) पोपटाच्या निमित्ताने (२) वेश्या

..३३..

महा भक्त प्रल्हाद हा दैत्यकूळीं।
जपे रामनामावळी नित्यकाळीं।
पिता पापरूपी तया देखवेना।
जनीं दैत्य तो नाम मूखें म्हणेना॥९६॥

मुखीं नाम नाहीं तया मुक्ति कैची।
अहंता गुणें यातना ते फुकाची।
पुढें अंत येईल तो दैन्यवाणा।
म्हणोनी म्हणा रे म्हणा देवराणा॥९७॥

हरी नाम नेमस्त पाषाण तारी।
बहू तारिले मानवदेहधारी।
तया रामनामीं सदा जो विकल्पी[१]।
वदेना कदा जीव तो पापरूपी॥९८॥

(१) सशंयी

..३४..

जगीं धन्य वाराणसी पुण्यरासी।
तयेमाजिं जातां गती पूर्वजांसी।
मुखे रामनामावळी नित्यकाळीं।
जिवा होत सांगे सदा चंद्रमौळी॥९९॥

येथासांग रे कर्म तें हि घडेना ।
घडे धर्म तें पुण्य गांठी पडेना।
दया पाहतां सर्व भूतीं असेना।
फुकाचे[१] मुखीं नाम तें हि वसेना॥१००॥

जया नावडे नाम त्या येम जाची[२]।
विकल्पें उठे तर्क त्या नर्क ची ची।
म्हणोनि अति आदरें नाम घ्यावें।
मुखें बोलतां दोष जाती स्वभावें॥१०१॥

(१) फुकाचे - फुकटचे (२) त्रास देतो

..३५..

अती लीनता सर्वभावें स्वभावें।
जना सज्जनालागिं संतोषवावें।
देहे कारणीं सर्व लावीत जावें।
सगूणीं अति आदरेंसी भजावें॥१०२॥

हरीकीर्तनें प्रीति रामीं धरावी।
देहेबुधि नीरूपणीं वीसरावी।
परद्रव्य आणीक कांता परावी।
येदर्थी मना सांडि[१] जीवीं करावी॥१०३॥

क्रियेवीण नानापरी बोलिजेतें।
परी चीत दुश्चीत[२] तें लाजवीतें।
मना कल्पना धीट सैराट[३] धावे।
तया मानवा देव कैसेनि पावे॥१०४॥

(१) सोडून द्यावे (२) भ्रष्टचित्त (३) स्वैर

..३६..

विवेकें क्रिया आपुली पालटावी।
अती आदरे शुध क्रिया धरावी।
जनीं बोलण्यासारिखें चाल बापा।
मना कल्पना सोडि संसारतापा॥१०५॥

बरी स्नानसंध्या करी येकनिष्ठा।
विवेकें मना आवरी स्थानभ्रष्टा[१]।
दया सर्व भूतीं जया मानवाला।
सदा प्रेमळु भक्तिभावें निवाला॥१०६॥

मना कोपआरोपणा[२] ते नसावी।
मना बुधि हे साधुसंगीं वसावी।
मना नष्ट चांडाळ[३] तो संग त्यागीं।
मना होई रे मोक्षभागीं विभागी[४]॥१०७॥

(१) वाईट जागा (२) क्रोध (३) दुष्ट प्रवृत्ति (४) वाटेकरी

..३७..

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें।
क्रिया पालटे भक्तिभावार्थं लागे।
क्रियेवीण वाचळता ते निवारी।
तुटे वाद[1] संवाद तो हीतकारी॥१०८॥

जनीं वाद वेवाद सोडूनि द्यावा ।
जनीं सूखसंवाद सूखें करावा।
जगीं तो चि तो शोकसंतापहारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥१०९॥

तुटे वाद संवाद त्यातें म्हणावें।
विवेकें अहंभाव यातें जिणावें[2]।
अहंतागुणें वाद नाना विकारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥११०॥

(१) द्वैत (२) जिंकावे

..३८..

हिताकारणें बोलणें सत्य आहे।
हिताकारणें सर्व शोधूनि पाहें।
हिताकारणें बंड पाषांड[1] वारी[2]।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥१११॥

जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला।
परी वाद वेवाद तैसा चि ठेला।
उठे संशयो वाद हा दंभधारी।
तुटे वाद संवाद तो हीतकारी॥११२॥

जनीं हीत पंडित सांडीत गेले।
अहंतागुणें बह्मराक्षेस झाले।
तयांहूनि वित्पन्न[3] तो कोण आहे।
मना सर्व जाणीव सांडूनि राहे॥११३॥

(१) नास्तिकता (२) नाहिशी करणे (३) ज्ञानी

..३९..

फुकाचें मुखीं बोलतां[1] काय वेचे।
दिसेंदीस अभ्यांतरीं गर्व सांचे।
क्रियेवीण वाचाळता वेर्थ आहे।
विचारें तुझा तूं चि शोधून पाहें॥११४॥

तुटे वाद संवाद तेथें करावा।
विवेकें अहंभाव हा पालटावा।
जनी बोलण्यासारखें आचरावें।
क्रियेपालटें भक्तिपंथें चि जावें॥११५॥

बहू श्रापितां[2] कष्टला अंबऋषी।
तयाचे स्वयें श्रीहरी जन्म सोशी।
दिल्हा क्षीरसिंधू[3] तया ऊपमानी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥११६॥

(१) उगाचच शब्द पांडित्य (२) शाप दिला असता
(३) दुधाचा समुद्र

..४०..

धुरुं लेकरुं बापुडें दैन्यवाणें।
कृपा भाकिता दीधली भेटि जेणें।
चिरंजीव तारांगणीं[1] प्रेमखाणी[2]।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥११७॥

गजेंद्रू[3] महां संकटीं वास[4] पाहे।
तयाकारणें श्रीहरी धांवताहे।
उडी घातली जाहला जीवदानी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥११८॥

अजामेळ पापी तया अंत आला।
कृपाळूपणें तो जनीं मुक्त केला।
अनाथासि आधार हा चक्रपाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥११९॥

(१) तारकांनी भरलेले आकाश (२) प्रेमाची खाण
(३) एका हत्तीचे नाव (४) वाट/प्रतिक्षा

..४१..

विधीकारणें जाहला मछ[१] वेगीं।
धरी कूर्मरूपें[२] धरा[३] पुष्टिभागीं।
जना रक्षणाकारणें नीच योनी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२०॥

महां भक्त प्रल्हाद हा कष्टवीला।
म्हणोनी तयाकारणें सिंह्य जाला।
न ये ज्वाळ वीषाळ[४] संन्नीध कोण्ही।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२१॥

कृपा भाकितां जाहला वज्रपाणी[५]।
तयाकारणें वामनु चक्रपाणी[६]।
द्विजांकारणें भार्गवु च्यापपाणी[७]।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२२॥

(१) मासा (२) कासवाचे रूप (३) पृथ्वी (४) प्रचंड
(५) इंद्र (६) विष्णु (७) परशुराम

..४२..

अहिले सतीलागि आरण्यपंथे।
कुढावा[१] पुढें देव बंदी तयातें।
बळें सोडितां घाव घाली निशाणी।
नुपेक्षी कदा रामदासाभिमानी॥१२३॥

तये द्रुपदीकारणें लागवेगें।
त्वरें धांवतु सर्व सांडूनि मागें।
कळीलागि जाला असें बोध्य मौनी[२]।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२४॥

अनाथां दिनाकारणें जन्मताहे।
कलंकी[३] पुढें देव होणार आहे।
जया वर्णितां सीणली वेदवाणी।
नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी॥१२५॥

(१) आश्रय (२) मौनव्रत धारण करणारे भगवान बुद्ध
(३) कलंकी अवतार

..४३..

जनाकारणें देव लीळावतारी।
बहूतांपरी आदरें वेषधारी।
तया नेणती[१] ते जन पापरूपी।
दुरात्मे महां नष्ट चांडाळ पापी॥१२६॥

जगीं धन्य तो रामसूखें निवाला।
कथा ऐकतां सर्व तल्लीन जाला।
देहेभावना रामबोधें उडाली।
मनोवासना रामरूपीं बुडाली॥१२७॥

मना वासना वासुदेवीं वसों दे।
मना कामना कामसंगीं नसों दे।
मना कल्पना वाऊगी[२] ते न कीजे।
मना सज्जना सज्जनीं वस्ति की जे॥१२८॥

(१) मानत नाहीत. (२) चुकीची

..४४..

गतीकारणें संगती सज्जनाची।
मती पालटे सूमती दुर्जनाची।
रतीनायिकेचा पती नष्ट आहे।
म्हणोनी मनातीत होऊनी राहें॥१२९॥

मना अल्प संकल्प तो ही नसावा।
सदा सत्य संकल्प चित्तीं वसावा।
जनीं जल्प[१] वीकल्प[२] तो ही तजावा[३]।
रमाकांत येकांतकाळीं भजावा॥१३०॥

भजाया जनीं पाहतां राम येकु।
करीं बाण येकु मुखीं शब्द येकु।
क्रिया पाहतां उधरे सर्व लोकु।
धरा जानकीनायकाचा विवेकु॥१३१॥

(१) बडबड (२) संशय (३) टाकून द्यावा

..४५..

विचारुनि बोले विवंचूनि चाले।
तयाचेनि संतप्त ते ही निवाले।
बरे शोधिल्यावीण बोलों नको हो।
जनीं चालणें शुध नेमस्त राहो॥१३२॥

हरीभक्त वीरक्त विज्ञानरासी।
जेणें मानसीं स्थापिलें निश्चयासीं।
तया दर्शने स्पर्शने पुण्य जोडे।
तया भाषणें नष्ट संदेह मोडे॥१३३॥

नसे गर्व आंगीं सदा वीतरागीं [1]।
क्षमा शांति भोगी दया दक्ष योगी।
नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा।
यहीं लक्षणीं जाणिजे योगिराणा॥१३४॥

(१) वैराग्यशाली

..४६..

धरी रे मना संगती सज्जनाची।
जेणें वृत्ति हे पालटे दुर्जनाची।
बळे भाव सद्बुधि सन्मार्ग लागे।
महा क्रूर तो काळ विक्राळ भंगे॥१३५॥

भये व्यापिलें सर्व ब्रह्मांड आहे।
भयातीत तें संत आनंत पाहें।
जया पाहतां द्वैत कांहीं दिसेना।
भय मानसीं सर्वथा ही असेना॥१३६॥

जिवां श्रेष्ठ ते पष्ट सांगोनि गेले।
परी जीव अज्ञान तैसेचि ठेले।
देहेबुधिचें कर्म खोटें टळेना।
जुनें ठेवणें[1] मीपणें आकळेना॥१३७॥

(१) ठेवा/संपत्ती

..४७..

भ्रमे नाडळे[1] वीत ते गुप्त जालें।
जिवा जन्मदारिद्र ठाकूनि आलें।
देहेबुधिचा निश्चयो ज्या टळेना।
जुनें ठेवणें मीपणें आकळेना॥१३८॥

पुढें पाहतां सर्व ही कोंदलेंसे[2]।
अभाग्यास हें दृश्य पाषाण भासे।
अभावें[3] कदा पुण्य गांठीं पडेना।
जुनें ठेवणें मीपणें आकळेना॥१३९॥

जयाचें तया चूकलें प्राप्त नाहीं।
गुणें गोविलें[4] जाहलें दुख देहीं।
गुणावेगळी[5] वृत्ति ते ही वळेना।
जुनें ठेवणें मीपणें आकळेना॥१४०॥

(१) आढळत नाही (२) संपूर्णपणे व्यापलेले (३) अश्रद्धेमुळे
(४) बांधुन टाकले (५) तीन्ही गुणांपासुन वेगळी

..४८..

म्हणे दास सायास त्याचे करावे।
जनीं जाणता पाय त्याचे धरावे।
गुरुअंजनेंवीण तें आकळेना।
जुनें ठेवणें मीपणें तें कळेना॥१४१॥

कळेना कळेना कळेना ढळेना।
ढळे नाढळे संशयो ही ढळेना।
गळेना गळेना अहंता गळेना।
बळें आकळेना मिळेना मिळेना॥१४२॥

अविद्यागुणें[1] मानवा ऊमजेना।
भ्रमें चूकलें हीत तें आकळेना।
परीक्षेविणें बांधलें दृढ नाणें।
परी सत्य मिथ्या असें कोण जाणें॥१४३॥

(१) अज्ञानामुळे

..४९..

जगीं पाहतां साच[१] तें काय आहे।
अती आदरें सत्य शोधूनि पाहें।
पुढें पाहतां पाहतां देव जोडे।
भ्रमें भ्रांति अज्ञान हें सर्व मोडे।।१४४।।

सदा वीषयो[२] चिंतितां जीव जाला।
अहंभाव अज्ञान जन्मासि आला।
विवेकें सदा सस्वरूपीं[३] भरावें।
जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें।।१४५।।

दिसे लोचनीं तें नसे कल्पकोडी[४]।
अकस्मात आकारलें काळ मोडी।
पुढें सर्व जाईल कांही न राहे।
मना संत आनंत शोधूनि पाहें।।१४६।।

(१) सत्य (२) भौतिक अपेक्षा (३) आत्मा परमात्म्यात विलीन करणे (४) अनंत काळापर्यंत

..५०..

फुटेना तुटेना चळेना ढळेना।
सदा संचलें[१] मीपणें तें कळेना।
तया एकरूपासि दूजें न साहे।
मना संत आनंत शोधूनि पाहें।।१४७।।

निराकार आधार ब्रह्मादिकांचा ।
जया सांगतां सीणली वेदवाचा।
विवेकें तदाकार[२] होऊनि राहें।
मना संत आनंत शोधूनि पाहें।।१४८।।

जगीं पाहतां चर्मचक्षी[३] न लक्षे[४]।
जगी पाहतां ज्ञानचक्षीं[५] न रक्षे।
जगीं पाहतां पाहणें जात आहे।
मना संत आनंत शोधूनि पाहें।।१४९।।

(१) व्यापून असलेले (२) शाश्वताशी एकरूप
(३) साध्या डोळ्यांनी (४) दिसणे (५) ज्ञान दृष्टीने

..५१..

नसे पीत[१] ना श्वेत ना शाम कांहीं।
नसे वेक्त[२] आवेक्त[३] ना नीळ नाहीं।
म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहें।
मना संत आनंत शोधूनि पाहें।।१५०।।

खरें शोधितां शोधितां शोधताहे।
मना बोधितां बोधितां बोधताहे।
परी सर्व ही सज्जनाचेनि योगें।
बरा निश्चयो पाहिजे सानुरागें।।१५१।।

बहूतां परी कूसरी[४] तत्वझाडा[५]।
परी पाहिजे अंतरीं तो निवाडा।
मना सार साचार तें वेगळें रे।
समस्तांमधें येक तें आगळें रे।।१५२।।

(१) पीवळे (२) व्यक्त (३) अव्यक्त/अदृष्य
(४) कुशलता (५) तत्वांचे विवरण

..५२..

नव्हे पिंडज्ञानें[१] नव्हें तत्त्वज्ञानें।
समाधान कांहीं नव्हे तानमानें।
नव्हे योगयागें नव्हे भोगत्यागें।
समाधान तें सज्जनाचेनि योगें।।१५३।।

महांवाक्य[२] तत्वादिकें पंचीकर्णे[३]।
खुणें पाविजे संतसंगे विवर्णे।
द्वितीयेसि[४] संकेत जो दाविजेतो।
तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो।।१५४।।

दिसेना जनीं तेंचि शोधूनि पाहें।
बरें पाहतां गूज[५] तेथें चि आहे।
करीं[६] घेउं जातां कदा आडळेना[७]।
जनीं सर्व कोंदाटलें ते कळेना।।१५५।।

(१) शरीरज्ञान (२) ब्रह्माचे वर्णन (३) पाच महाभूतांचे मिश्रण (४) अमावस्या नंतरच्या द्वितीयेला (५) रहस्य
(६) हातात (७) सापडत नाही

म्हणे जाणता तो जनीं मूर्ख पाहे।
अतर्कासि तर्की असा कोण आहे।
जनीं मीपणें पाहतां पाहवेना।
तया लक्षितां[१] वेगळें राहवेना॥१५६॥

बहू शास्त्र धूंडाळितां वाड[२] आहे।
जया निश्चयो येक तो ही न साहे।
मती भांडती शास्त्रबोधे[३] विरोधें।
गती खुंटती ज्ञानबोधें प्रबोधें॥१५७॥

श्रुति[४] न्याय[५] मीमांसके[६] तर्कशास्त्रें।
स्मृति वेद वेदान्तवाक्यें विचित्रें।
स्वयें शेष[७] मौनावला स्थीर पाहे।
मना सर्व जाणीव सांडून राहे॥१५८॥

(१) पाहूदाता (२) विस्तृत (३) शास्त्राचे ज्ञान (४) वेद
(५) न्यायदर्शन (६) मिमांसाशास्त्र (७) नाग



जेणें मक्षिका[१] भक्षिली जाणिवेची।
तया भोजनाची रुची प्राप्ति कैंची।
अहंभाव ज्या मानसींचा विरेना।
तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना॥१५९॥

नको रे मना वाद हा खेदकारी।
नको रे मना भेद नाना विकारी।
नको रे मना सीकऊं पूढिलांसि[२]।
अहंभाव जो राहिला तूजपासीं॥१६०॥

अहंतागुणें सर्व ही दुख होतें।
मुखे बोलिलें ज्ञान तें वेर्थ जातें।
सुखी राहतां सर्व ही सूख आहे।
अहंता तुझी तूं चि शोधूनि पाहें॥१६१॥

(१) माशी (२) दुसऱ्याला इतरांना



अहंतागुणें नीति सांडी विवेकी।
अनीतीबळें श्लाघ्यता सर्व लोकीं।
परी अंतरीं सर्व ही साक्ष येते।
प्रमाणांतरें[१] बुद्धि सांडूनि जाते॥१६२॥

देहेबुधिचा[२] निश्चयो दृढ जाला।
देहातीत तें हीत सांडीत गेला।
देहेबुधि ते आत्मबुधी करावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६३॥

मनें कल्पिला वीषयो सोडवावा।
मनें देव निर्गूण[३] तो वोळखावा।
मनें कल्पितां कल्पना ते सरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६४॥

(१) नाना प्रकारची प्रमाणे (२) अहंकाराचा प्रभाव
(३) अनेक गुणांनी युक्त



देहादीक प्रपंच हा चिंतियेला।
परी अंतरी लोभ निश्चीत ठेला।
हरिचिंतनें मुक्तिकांता[१] वरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६५॥

अहंकार विस्तारला या देहाचा।
स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा।
बळें भ्रांति[२] हे जन्मचिंता हरावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६६॥

बरा निश्चयो शाश्वताचा करावा।
म्हणे दास संदेह तो वीसरावा।
घडीनें[३] घडी सार्थकाची करावी।
सदा संगती सज्जनाची धरावी॥१६७॥

(१) मोक्षरूपी पत्नी (२) भ्रम (३) क्षण न क्षण

करी वृत्ति जो संत तो संत जाणा।
दुराशागुणें जो नव्हे दैन्यवाणा।
उपाधी[1] देहेबुधितें वाढविते।
परी सज्जना केवि बाधूं शके ते।।१६८।।

नसे अंत आनंत[2] संता पुसावा।
अहंकार विस्तार हा नीरसावा।
गुणेंवीण निर्गूण तो आठवावा।
देहेबुधिचा आठऊं[3] नाठवावा[4]।।१६९।।

देहबुधि हे ज्ञानबोधें तजावी।
विवेकें तये वस्तुची[5] भेटि घ्यावी।
तदाकार[6] हे वृत्ति नाहीं स्वभावें।
म्हणोनी सदा तें चि शोधीत जावें।।१७०।।

(१) प्रापंचीक जवाबदारी (२) भाग्यवंत (३) आठवण (४) नसावी (५) परमेश्वराची (६) त्याच्याशी एकरूप



असे सार साचार तें चोरलेंसे।
येहीं लोचनीं पाहतां दृश्य भासे।
निराभास[1] निर्गूण तें आकळेना।
अहंतागुणें कल्पितां ही कळेना।।१७१।।

स्फुरे वीषयीं कल्पना ते अविद्या।
स्फुरे ब्रह्म रे जाण माया सुविद्या।
मुळीं कल्पना दों रुपें ते चि जाली।
विवेकें तरी सस्वरूपीं मिळाली।।१७२।।

स्वरूपी उदेला[2] अहंकार राहो[3]।
तेणें सर्व आछ्यादिलें व्योम पाहों।
दिशा पाहतां ते निशा वाढताहे।
विवेकें विचारें विवंचूनि[4] पाहे।।१७३।।

(१) भास नसलेले (२) उदय पावला (३) राहु नावाचा ग्रह (४) विवरण करून



जया चक्षुनें लक्षितां लक्षवेना।
भवा भक्षितां रक्षितां रक्षवेना।
क्षयातीत[1] तो आक्षै मोक्ष देतो।
दयादक्ष[2] तो साक्षिनें पक्ष[3] घेतो।।१७४।।

विधी निर्मितां लीहितो सर्व भाळीं।
परी लीहिता कोण त्याचे कपोळीं।
हरु[4] जाळितो लोक संव्हारकाळीं।
परी सेवटीं शंकरा कोण जाळी।।१७५।।

जगीं द्वादशादीत्य हे रुद्र आक्रा।
असंख्यात संख्या करी कोण शक्रा[5]।
जगीं देव धुंडाळितां आडळेना।
जनीं मुख्य तो कोण कैसा कळेना।।१७६।।

(१) नाश नसलेला म्हणजेच अक्षय (२) शिष्यांवर दया करणारा (३) बाजु (४) शंकर (५) गणना



तुटेना फुटेना कदा देवराणा।
चळेना ढळेना कदा दैन्यवाणा।
कळेना कळेना कदा लोचनासी।
वसेना दिसेना जगीं मीपणासी।।१७७।।

जया मानला देव तो पूजिताहे।
परी देव शोधूनि कोणही न पाहे।
जगीं पाहतां देव कोट्यानकोटी।
जया मानली भक्ति जे तेचि मोठी।।१७८।।

तिन्ही लोक जेथूनि निर्माण जाले।
तया देवरायासि कोणही न बोले।
जगीं थोरला देव तो चोरलासे।
गुरुवीण तो सर्वथा ही न दीसे।।१७९।।

..६१..

गुरु पाहतां पाहतां लक्ष कोटी।
बहूसाल[१] मंत्रावळी शक्ति मोठी।
मनीं कामना चेटकें[२] धातमाता[३]।
जनीं वेर्थ रे तो नव्हे मुक्तिदाता।।१८०।।

नव्हे चेटकी चाळकु[४] द्रव्यभोंदु[५]।
नव्हे निंदकु मछरु भक्तिमंदु[६]।
नव्हे उन्मतु[७] वेसनी[८] संगबाधु।
जगीं ज्ञानिया तो चि साधु अगाधु[९]।।१८१।।

नव्हे वाउगी[१०] चाहुटी[११] काम पोटीं।
क्रियेवीण वाचाळता ते चि मोठी।
मुखें बोलिल्यासारखें चालताहे।
मना सद्गुरु तोचि शोधूनि पाहे।।१८२।।

(१) नाना प्रकारचे (२) जादुटोणा (३) मंत्रतंत्र
(४) फसवणारा (५) पैशाचा लोभी (६) भक्तिहिन
(७) उन्मत्त (८) व्यसनी (९) गंभीर (१०) व्यर्थ (११) चावट

..६२..

जनीं भक्त ज्ञानी विवेकी विरागी[१]।
कृपाळु मनस्वी क्षमावंत योगी।
प्रभु दक्ष वित्पन्न चातुर्य जाणे।
तयाचेन योगें समाधान बाणे।।१८३।।

नव्हे तें चि जालें नसे तें चि आलें।
कळों लागलें सज्जनाचेनि बोलें।
अनिर्वाच्य[२] तें वाच्य वाचे वदावें।
मना संत आनंत शोधीत जावें।।१८४।।

लपावें अती आदरें रामरुपीं।
भयातीत निश्चीत ये सस्वरुपीं।
कदा तो जनीं पाहतां ही दिसेना।
सदा ऐक्य तो भिन्नभावें वसेना।।१८५।।

(१) वैराग्यशाली (२) ज्याचे वर्णन करता येत नाही

..६३..

सदा सर्वदा राम सन्नीध आहे।
मना सज्जना सत्या शोधून पाहें।
अखंडीत भेटी रघूराज योगु।
मना सांडि रे मीपणाचा वियोगु।।१८६।।

भुतें पिंड ब्रह्मांड हें ऐक्य आहे।
परी सर्व ही सस्वरूपीं न साहे।
मना भासलें सर्व कांहीं पहावें।
परी संग सोडूनि सूखी रहावें।।१८७।।

देहेभान हें ज्ञानशस्त्रें खुडावें।
विदेहीपणें भक्तिमार्गें चि जावें।
विरक्तीबळें[१] निंद्य सर्वै तजावें।
परी संग सोडूनि सूखें रहावें।।१८८।।

(१) वैराग्याच्या जोरावर

..६४..

मही[१] निर्मिली देव तो वोळखावा।
जया पाहतां मोक्ष तत्काळ जीवा।
तया निर्गुणालागि गुणीं पहावें।
परी संग सोडूनि सूखें रहावें।।१८९।।

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता[२]।
परेहूनि पर्ता[३] न लिंपे विवर्ता[४]।
तया निर्विकल्पासि[५] कल्पीत जावें।
परी संग सोडूनि सूखें राहावें।।१९०।।

देहेबुधिचा निश्चयो ज्या टळेना।
तया ज्ञान कल्पांतकाळीं[६] कळेना।
परब्रह्म तें मीपणें आकळेना।
मनीं शून्य अज्ञान हें मावळेना।।१९१।।

(१) पृथ्वी (२) जगाचे पालन करणारा (३) पलीकडचा
(४) भ्रम/माया (५) कल्पनांच्या पलीकडले (६) शेवटपर्यंत

..६५..

मना ना कळे ना ढळे रुप ज्याचें।
दुजेवीण तें ध्यान सर्वोत्तमाचें।
तया खूण ते हीण दृष्टान्त[१] पाहे।
तेथें संग निसंग दोनी न साहे॥१९२॥

नव्हे जाणता नेणता देवराणा।
न ये वर्णितां वेदशास्त्रां पुराणां।
नव्हे दृश्य अदृश्य साक्षी तयाचा।
श्रुति नेणती नेणती[२] अंत त्याचा॥१९३॥

वसे हृदयीं देव तो कोण कैसा।
पुसे आदरें साधकु[३] प्रेष्ण ऐसा।
देहे टाकितां देव कोठें रहातो।
परी मागुता ठाव कोठें पहातो॥१९४॥

(१) तुलना (२) कळत नाही (३) ज्याला ईश्वर प्राप्तीची ईच्छा आहे

..६६..

वसे हृदयी देव तो जाण ऐसा।
नभाचे परी व्यापक जाण तैसा।
सदा संचला[१] येत ना जात कांही।
तयावीण कोठें रिता ठाव[२] नाहीं॥१९५॥

नभीं वावरे जो अणुरेणु कांही।
रिता ठाव या राघवेंवीण नाहीं।
तया पाहतां पाहतां तेंचि जालें।
तेथें लक्ष आलक्ष[३] सर्वै बुडालें॥१९६॥

नभासारिखें रूप या राघवाचें।
मनी चिंतितां मूळ तूटे भवाचें।
तया पाहतां देहबुधी उरेना।
सदा सर्वदा आर्त[४] पोटीं पुरेना[५]॥१९७॥

(१) व्यापला (२) ठिकाण (३) जे दिसु शकत नाही (४) ईच्छा (५) तृप्त होईना

..६७..

नभें व्यापिलें सर्व सृष्टीस आहे।
रघूनायिका उपमा ते न साहे।
दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावें।
तया व्यापकु व्यर्थ कैसें म्हणावें॥१९८॥

अती जीर्ण[१] विस्तीर्ण तें रुप आहे।
तेथे तर्क संपर्क तोही न साहे।
अती गूढ तें दृढ तत्काळ सोपें।
दुजेवीण जें खूण स्वामीप्रतापें॥१९९॥

कळे आकळे रूप तें ज्ञान होतां।
तेथें आटली सर्वसाक्षी[२] अवस्था।
मना उन्मनी[३] शब्द कुंठीत राहे।
तो गे तो चि तो राम सर्वत्र पाहे॥२००॥

(१) पुरातन (२) सर्वत्र भगवंत दिसणे (३) मन नाहीसे होणे

..६८..

कदा वोळखीमाजी दूजे[१] दिसेना।
मनीं मानसीं द्वैत कांहीं वसेना।
बहूतां दिसां आपुली भेटि जाली।
विदेहीपणें सर्व काया निवाली[२]॥२०१॥

मना गूज रे तूज हें प्राप्त जालें।
परी अंतरीं पाहिजे येत्न केलें।
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी।
धरीं सज्जनसंगती धन्य होसी॥२०२॥

मना सर्वही संग सोडूनि द्यावा।
अती आदरें सज्जनाचा धरावा।
जयाचेनि संगे महां दुख भंगे।
जनीं साधनेंवीण सन्मार्ग लागे॥२०३॥

(१) दुसरे (२) शांत झाली

..६९..

मना संग हा सर्व संगास तोडी।
मना संग हा मोक्ष तत्काळ जोडी।
मना संग हा साधकां सीघ्र सोडी।
मना संग हा द्वैत निशेष मोडी।।२०४।।

मनाचीं शतें[१] ऐकतां दोष जाती।
मतीमंद ते साधना योग्य होती।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्ये आंगीं।
म्हणे दास विश्वासतां मुक्ति भोगी॥२०५॥

।। जय जय रघुवीर समर्थ।।

(१) २०५ श्लोक

..७०..

## आरती मनोबोधाची

वेदोंचें जें गुह्य शास्त्रांचें जें सार।
प्राकृत शब्दांमाजी केला विस्तार।।
कर्म उपासना ज्ञान गंभीर।
ज्याच्या मननमात्रें आत्मा गोचर।।१।।

जयदेव जयदेव जय मनोबोधा।
पंचप्राणें आरती तुज स्वात्मशुद्धा ।।ध्रु०।।

दोन शतें पांच श्लोक हे जाण।
श्रवणें अर्थे साधक पावति हे खूण।।
परमार्थासी सुलभ मार्ग हा पूर्ण।
यशवंत सद्गुरु दासाचा प्राण।।२।।

।। सीताकान्त स्मरण जय जय राम ।।

..७१..

## आरती श्रीरामचंद्राची

उत्कट साधुनि शिळा-सेतू बांधोनी। लिंगदेहलंकापुरि विध्वंसूनी।। कामक्रोधादिक राक्षस मर्दूनी। देह-अहंभाव रावण निवटोनी।।१।। जय देव जय देव निजबोधा रामा।। परमार्थे आरती, सद्भावें आरती परिपूर्णकामा।।ध्रु०।। प्रथम सीताशुद्धीं हनुमंत गेला। लंकादहन करुनी अखया मारिला।। मारिला जंबूमाळी भुवनीं त्राहाटीला। आनंदाची गूढी घेउनियां आला।। जय०।।२।। निजबळें निजशक्ती सोडविली सीता। म्हणुनी येणें झालें आयोध्ये रघुनाथा।। आनंदे वोसंडे वैराग्य-भरता। आरति घेउनि आली कौसल्या माता।।जय०।।३।। अनुहतध्वनी गर्जति अपार। अठरा पद्में वानर करिती भुभु:कार।। अयोध्येसी आले दशरथकुमार। नगरीं होत आहे आनंद थोर।। जय०।।४।। सहज सिंहासनीं राजा रघुवीर। सोहंभावें तया पूजा उपचार।। सहजांची आरती वाद्यांचा गजर। माधवदासा स्वामी आठव ना विसर।। जय देव०।।५।।

..७२..

## आरती श्रीरामदासस्वामींची

ओंवाळूं सद्गुरु रामदास राणा।।
पंचहि प्राणांचा दीप लाविला जाणा।।ध्रु०।।

अज्ञानतिमिरज्योति सद्गुरु उजळल्या वाती।
ज्ञानबोध प्रगटला तेणें प्रकाशली दीप्ती।।
ओवाळूं सद्गुरु रामदास राणा।
पंचहि प्राणांचा दीप लाविला जाणा।।१।।

निर्गुण निरंजन ज्योति सद्गुरु रामदास।
दर्शन मंगलप्रद कल्याणाचा कळस।।
ओंवाळूं सद्गुरु रामदास राणा।
पंचहि प्राणांचा दीप लाविला जाणा।।२।।

।। जय जय रघुवीर समर्थ।।

## प्रस्तावना

समर्थ रामदासांचा जन्म इ.स. १६०८ साली मराठवाड्यात जांब या गावी झाला. लहानपणा-पासून त्यांना विश्वाची चिंता लागली होती. त्यावेळचे यवन राज्यकर्ते अत्यंत क्रूर होते आणि हिंदू जनतेवर ते खूप अन्याय करीत होते. लोकांची ही दु:ख समर्थांना पहावत नव्हती. तपश्चर्या करुन भगवंताला प्रसन्न करुन घ्यावयाचे आणि त्याच्या आशीर्वादाने देशसेवा आणि धर्मसंस्थापना करायची असे त्यांनी लहानपणीच ठरवले. त्यानुसार वयाच्या बाराव्या वर्षी ते घरातून पळून गेले. त्यांनी नाशिक येथे बारा वर्षे कठोर तप:श्चर्या केली. व्यायाम करुन आपले शरीर सुदृढ केले. अनेकविध ग्रंथांचा अभ्यास करुन ज्ञान संपादन केले. नाशिक येथे त्यांना रामरायाचे प्रत्यक्ष दर्शन झाले आणि राष्ट्रकार्याचा आदेश मिळाला.

इ.स. १६३२ ते १६४४ ही बारा वर्षे समर्थांनी पायी भ्रमण केले. त्यांनी देशस्थितीचा आणि समाजस्थितीचा अभ्यास केला. जागोजागी मठ स्थापन केले. १० ते २० या वयोगटातील मुलांना जवळ केले. त्यांना व्यायाम करायला प्रवृत्त केले. त्यासाठी प्रत्येक गावात हनुमंताचे मंदिर स्थापन केले. या सर्व मुलांना संत वाङ्मयाचा अभ्यास करायला सांगितला. 'व्यायाम करा, अभ्यास करा, आपला धर्म समजावून घ्या आणि सर्वांना समजावून सांगा' अशी त्यांची साधी आणि सोपी शिकवण होती. समर्थांनी प्रयत्नवाद आणि बलोपासना यावर भर दिला. त्यांचे सगळे शिष्य नियमितपणे व्यायाम करीत. समर्थ संप्रदाय म्हणजे बुद्धिमान आणि बलशाली तरुणांची संघटना ठरला. या संघटनेचा छत्रपती शिवाजी महाराजांना स्वराज्य स्थापन करण्याच्या कामी फार उपयोग झाला. छत्रपती शिवाजी आणि समर्थ रामदास यांनी अखंड ३० वर्षे परस्परांना पूरक असे काम केले. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर रामदास स्वामींना अत्यंत दु:ख झाले म्हणून १६८२ साली त्यांनी देह ठेवला. सज्जनगडावर त्यांचे समाधी मंदिर आहे.

समर्थांनी अनेक ग्रंथ लिहिले. त्यातील मनाचे श्लोक हे छोटेसे पुस्तक फार लोकप्रिय ठरले. आजही महाराष्ट्रातील अनेक मुले लहानपणी मनाचे श्लोक पाठ करतात. समर्थांच्या मते माणसाने दुसऱ्याला उपदेश करण्यापेक्षा स्वत: सुधारावे, स्वत:मध्ये बदल घडवून आणावा आणि इतरांना मदत करावी. जीवन आनंदाने कसे जगावे आणि सर्वांशी प्रेमाने कसे वागावे याची कला शिकविणारा ग्रंथ म्हणजे मनाचे श्लोक होय.

सुनील चिंचोलकर
अजिंक्यनगर, हिंगणे खुर्द, पुणे - ५१.

**समर्थ रामदास जन्मोत्सव चतु:शताब्दी सोहळा**

या समितीने प्रकाशित केलेले अन्य पुस्तके

**समर्थ रामदास आणि संत तुकाराम**
लेखक - डॉ. जगदिश मा. करमळकर

**समर्थ रामदास विरचित गुरुगीता**
संपादक - सुनील चिंचोलकर

समर्थांची विद्यार्थ्यांकरीता
**अमृतवाणी विद्यार्थ्यांचे रामदास**

**युवकांचा स्फूर्तिनिर्झर**
समर्थ रामदास

**भीमरुपी स्तोत्र**
अर्थ-विवरण - सुनील चिंचोलकर

इंग्रजी भाषेत : **1. Samarth Ramdas and Self Management** • Author : Shri. Sunil Chincholkar
**2. Dialogue with Mind; Way of Life by Samarth Ramdas** • Author : Dr. Vinita Mahajani
जर्मन भाषेत : **Lebenswege Von Samarth Ramdas** • Author : Dr. Vinita Mahajani

।। श्रीराम ।।

श्रीसमर्थ रामदासस्वामीकृत

# श्रीमनाचे श्लोक

(श्रीसमर्थांचे संक्षिप्त चरित्र टीपा, आरतीसह)

संपादक

सुनील चिंचोलकर

**मूल्य : आचरण**

प्रकाशक

श्री समर्थ रामदास जन्मोत्सव चतुःशताब्दी सोहळा


प्रकाशक

**श्री समर्थ रामदास जन्मोत्सव चतुःशताब्दी सोहळा**

वैष्णव २१८४/ब, सदाशिव पेठ,

वेदशास्त्रोत्तेजक सभेजवळ, पुणे ४११ ०३०.

फोन : २४३३१३९८/६५३४०३७०

●



सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन



●

प्रथम आवृत्ती : गुरुपौर्णिमा, शके १९३०

(१८ जुलै २००८)

●

मुद्रक : सुधीर जोशी

चिंतामणी प्रिन्टर्स, ३२/१/५ एरंडवणा,

गोडसे भवन, पुणे ३०

●

प्रमुख विक्रेते

**अनमोल डिस्ट्रीब्युटर्स**

५३५, सी शॉप नं. ९, राधाकृष्ण बिल्डिंग,

प्रभात टॉकीजसमोर, पुणे ४११०३०.


## भगवंताकडे काय मागावे ?...

कोमळ वाचा दे रे राम। विमळ करणी दे रे राम।।धृ।।
प्रसंग ओळखी दे रे राम। धूर्तकळा मज दे रे राम।।
हितकारक दे रे राम। जनसुखकारक दे रे राम।।
अंतरपारखी दे रे राम। बहुजनमैत्री दे रे राम।।
विद्यावैभव दे रे राम। उदासीनता दे रे राम।।
मागो नेणे दे रे राम। मज न कळे ते दे रे राम।।
तुझी आवडी दे रे राम। दास म्हणे मज दे रे राम।।

संगीत गायन दे रे राम। आलाप गोडी दे रे राम।।
धातमाता दे रे राम। अनेक धाटी दे रे राम।।
रसाळ मुद्रा दे रे राम। जाड कथा मज दे रे राम।।
दस्तक टाळी दे रे राम। नृत्यकला मज दे रे राम।।
प्रबंध सरळी दे रे राम। शब्द मनोहर दे रे राम।।
सावधपण मज दे रे राम। बहुत पाठांतर दे रे राम।।
दास म्हणे रे सद्‌गुण धाम। उत्तम गुण मज दे रे राम।।

पावनभिक्षा दे रे राम। दीनद्याळा दे रे राम।।
अभेदभक्ती दे रे राम। आत्मनिवेदन दे रे राम।।
तद्रुपता मज दे रे राम। अर्थारोहण दे रे राम।।
सज्जनसंगती दे रे राम। अलिप्तपण मज दे रे राम।।
ब्रह्म अनुभव दे रे राम। अनन्यसेवा दे रे राम।।
मजविण तू मज दे रे राम। दास म्हणे मज दे रे राम।।

श्री समर्थ रामदास स्वामीकृत

## ।। श्री रामाची प्रार्थना ।।

कल्याण करी देवराया।
जनहित विवरी।।धृ.।।

तळमळ तळमळ होतचि आहे।
हे जन हातिं धरी।।१।।

अपराधी जन चुकतचि गेले।
तुझा तूंचि सांवरी।।२।।

कठीण त्यावरी कठीण जालें।
आतां न दिसे उरी।।३।।

कोठें जावें काय करावें।
आरंभिली बोहरी।।४।।

दास म्हणे आम्ही केले पावलों।
दयेसि नाहीं सरी।।५।।